**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय**
३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.
दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com

**विषय**:- कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या 37 व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त

जा.क्र.कक्ष-1/ल.ले/कांदळवन/ 46 /सन 2026-27
फोर्ट, मुंबई 400001 दिनांक: 03 /06/2026

**प्रति,**

01. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
02. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
03. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/नवी मुंबई.
04. मा. पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रा)रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
05. मा. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई / ठाणे / कल्याण-डोंबिवली / मिरा-भाईंदर / वसई-विरार / नवी मुंबई / पनवेल / भिवंडी-निजामपूर/ उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
06. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
07. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
08. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)
09. मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO)
10. मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA)
11. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (SRA)
12. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)
13. मा. संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
14. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
15. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी.
16. विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग-उत्तर कोकण / दक्षिण कोकण
17. सहाय्यक वनसंरक्षक कांदळवन विभाग-उत्तर कोकण / दक्षिण कोकण
18. नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी.
19. बॉम्बे एन्व्हारमेंट ॲक्शन ग्रुप यांचे प्रतिनिधी.
20. श्री. स्टॅलिन डी, वनशक्ती (NGO)
21. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
22. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)

**संदर्भ** :- या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.कक्ष-1/ल.ले./ 18 /सन 2025-26 दि. 27/04/2026.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची 37 **वी** बैठक **मंगळवार, दिनांक** 28/04/2026 रोजी **मा. अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

(मधुमिथा एस.)
**सदस्य सचिव,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई**

**सोबत : बैठकीचे इतिवृत्त.**

## कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीच्या
## मंगळवार, दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजी झालेल्या ३७ व्या बैठकीचे इतिवृत्त

स्थळ :- विभागीय आयुक्त, कोकण यांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई

---

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली **कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची ३७ वी बैठक** आयोजित करण्यात आली. समितीचे सदस्य सचिव यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व माननीय अध्यक्ष यांच्या अनुमतीने विषयसुचीनुसार बैठकीस प्रारंभ करण्यात आला. समितीचे सदस्य सचिव यांनी कांदळवन संरक्षण व संवर्धन समिती संदर्भात PPT चे सादरीकरण केले व बैठकीच्या विषयसूचीनुसार जिल्हानिहाय आढावा घेतला.

सदर बैठकीस खाली नमूद अधिकारी व कर्मचारी **प्रत्यक्ष उपस्थित** होते तसेच काही अधिकारी **व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे** बैठकीत सहभागी झाले.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| 1 | श्रीमती रुबल अग्रवाल भा.प्र.से. | अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, यांचे कार्यालय, कोकण भवन |
| 2 | श्री. रविकिरण गोवेकर, भा.व.से. | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 3 | श्री. एन. आर. प्रवीण, भा. व. से. | मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे | मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे |
| 4 | श्रीमती मधुमिथा एस., भा.व.से. | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| 5 | श्री. सोमनाथ पोटरे | उप आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका | नवी मुंबई महानगरपालिका |
| 6 | श्री. मुधकर बोडके | उप आयुक्त, पर्यावरण | ठाणे महानगरपालिका |
| 7 | श्रीमती कांचन पवार | विभागीय वन अधिकारी | विभागीय वन अधिकारी, कांदळवन विभाग-दक्षिण कोकण, अलिबाग |
| 8 | श्री. दिपक खाडे | विभागीय वन अधिकारी | विभागीय वन अधिकारी कांदळवन विभाग-उत्तर कोकण, ठाणे |
| 9 | श्री. चंदन दे. डोंगरे | कार्यकारी अभियंता | मुंबई महानगरपालिका |
| 10 | श्री. पी. यु. खैरे | मोजणी अधिकारी (एमआयडीसी) | एम.आय.डी.सी |
| 11 | श्रीमती मनिषा प्रधान | मुख्य पर्यावरण अधिकारी | ठाणे महानगर पालिका |
| 12 | सौ. जयश्री जुनोनकर | उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई | उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई |
| 13 | श्री. डी. आर. पाटील | सहा.अधीक्षक, क्र. 1 | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| 14 | श्रीमती. दिपाली धिवरे | सहयोगी नियोजनकार, सिडको | सिडको, सी. बी. डी. बेलापूर |
| 15 | श्री. अजय वानखडे | उपनियोजनकार, सिडको | सिडको, सी. बी. डी. बेलापूर |

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | श्री. उमेश पाटील | तहसिलदार ठाणे, जि. ठाणे | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे |
| 17 | श्री. स्टलिन डी. | संचालक | वनशक्ती |
| 18 | श्री. अनिल पंडित | प्रकल्प अधिकारी | बॉम्बे एन्व्हायर्नमेंट ॲक्शन ग्रुप, मुंबई |
| 19 | श्री. एस. पी. मोहन | क्षेत्र अधिकारी | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई |
| 20 | श्री. नरेंद्र पगारे | विशेष अधिकारी, पर्यटन व वातावरण बदल | मुंबई महानगरपालिका |
| 21 | श्री. तानाजी नारनवर | पोलीस अधिक्षक | पोलीस अधिक्षक कार्यालय, रायगड अलिबाग |
| 22 | श्री. विक्रम र. कदम | सहायक पोलीस आयुक्त, खारघर विभाग | पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई |
| 23 | श्री. पवन वि. चांडक | उप विभागीय अधिकारी (महसूल) पनवेल | उप विभागीय अधिकारी कार्यालय, पनवेल उपविभाग |
| 24 | श्री. मंगेश बऱ्हाडे | सहायक पोलीस निरीक्षक, काशिमिरा | मिरा-भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय |
| 25 | श्री. अमर ढेंगे | पोलिस निरीक्षक | पोलीस आयुक्त कार्यालय, अभियान मुंबई शहर |
| 26 | श्री. एस के वालझाडे | पोलीस उपनिरीक्षक, ठाणे शहर | सुरक्षा ठाणे, शहर |
| 27 | श्री. मोनाली चौधरी | पोलीस निरीक्षक | न्हावाशेवा ठाणे, नवी मुंबई |
| | **व्ही. सी.द्वारे उपस्थित अधिकारी / कर्मचारी** | | |
| 1. | डॉ. इंदुराणी जाखड | जिल्हाधिकारी पालघर | जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर |
| 2 | श्रीम. आंचल गोयल | जिल्हाधिकारी मुंबई शहर | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| 3 | श्री. सौरभ कटियार | जिल्हाधिकारी उपनगर मुंबई | जिल्हाधिकारी कार्यालय, उपनगर मुंबई |
| 4. | श्रीम. तृप्ती धोडमिसे | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग |
| 5. | श्री. किरण जावळे | जिल्हाधिकारी रायगड | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड |
| 6 | - | पोलीस अधिक्षक | पोलीस अधिक्षक , पालघर |
| 7 | - | पोलीस अधिक्षक | पोलीस अधिक्षक , रत्नागिरी |
| 8 | - | PC & IT ठाणे, ग्रामीण | PC & IT ठाणे, ग्रामीण |

टिप :- व्हि.सी.व्दारे उपस्थित सदस्य यांचे नाव व कार्यालय यांचा बोध होत नसल्यामुळे वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | मुद्दा व विषय | झालेली चर्चा व घेण्यात आलेला निर्णय/ सूचना | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| 1 | कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करणेबाबत चर्चा. | **समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त यांनी, मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि. २०.०४.२०२६ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशांनुसार,** सर्व जिल्हाधिकाऱ्यांना महसूल विभागाच्या अखत्यारीतील कांदळवन क्षेत्रे त्वरेने कांदळवन कक्षाकडे हस्तांतरित करण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच, संबंधित जिल्हाधिकारी यांना इतर शासकीय विभाग व प्राधिकरणांना कांदळवन क्षेत्र हस्तांतरणाबाबत तात्काळ आवश्यक पत्रव्यवहार करण्याच्या सूचना दिल्या.<br>• खाजगी मालकीच्या जमिनीवरील कांदळवन क्षेत्रे वन विभागाकडे हस्तांतरित करण्याची आवश्यकता नाही; मात्र अशा क्षेत्रांची नोंद महसूली अभिलेख/ गाव नमूना 7/12 मार्गदर्शक सूचना महसूल व वन विभागाच्या दि.23 एप्रिल 2026 च्या शासन निर्णयानुसार तात्काळ कार्यवाही करुन अद्ययावत करणे आवश्यक आहे, असे स्पष्ट करण्यात आले.<br>• खालीलप्रमाणे क्षेत्र हस्तांतरण बाकी असल्याचे दिसून येते, तथापी महसूल विभागाने दिलेल्या माहितीत काही भिन्नता असल्याने मा. मुख्य सचिव यांच्या निर्देशानुसार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील हस्तांतरणाकरीता शिल्लक असलेल्या कांदळवन क्षेत्राची संयुक्त स्थळ पाहणी व अभिलेखांची पडताळणी करुन पडताळणी अंती नव्याने आढळलेले कांदळवन क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत संबंधित यंत्रणांना आवश्यक ते आदेश द्यावेत, जेणेकरून मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन होईल असे सह अध्यक्ष यांनी सांगितले. | **सर्व संबंधित जिल्हाधिकारी व कांदळवन कक्ष, मुंबई.** |

| अ.क्र. | जिल्हा | कांदळवन विभागाकडे हस्तांतरीत झालेले कांदळवन क्षेत्र (हे.) | कांदळवन विभागाकडे हस्तांतरीत होण्याकरीता शिल्लक कांदळवन क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | मुंबई शहर | 289.77 | 23.65 |
| 2 | मुंबई उपनगर | 4313.2672 | 2.82 |
| 3 | ठाणे | 3580.0098 | 432.2277 |
| 4 | पालघर | 4755.8185 | 3981.63 |
| 5 | रत्नागिरी | 2898.95 | 0.00 |
| 6 | सिंधुदुर्ग | 534.81 | 0.00 |
| 7 | रायगड | 11096.63 | 2948.19 |
| एकूण | | 27469.2555 | 7388.5177 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीबाबत/ इतिवृत्तांबाबतचा आढावा. | • मा. अध्यक्ष यांनी सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्हा व तालुका स्तरीय कांदळवन समितीच्या दरमहा बैठका घेऊन त्यांचे इतिवृत्त विभागीय आयुक्त, कोकण यांचे बैठकीपूर्वी सदस्य सचिवांकडे पाठविण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच जिल्हा स्तरीय समितीचे सदस्य सचिव असलेले संबंधित सहायक वनसंरक्षक, कांदळवन विभाग, उत्तर व दक्षिण यांना समितीचे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून वेळ घेऊन कांदळवन समितीच्या नियमीत बैठका घेण्याकरीता त्यांचे स्तरावर पत्रव्यवहार करण्याच्या सूचना दिल्या. | सर्व संबंधित जिल्हाधिकारी, विभागीय वन अधिकारी व उत्तर कोकण व दक्षिण कोकण |
| 3 | समितीकडील जिल्हा निहाय एकूण 36 प्रलंबित ऑफलाईन तक्रारींबाबत आढावा. | • मा.अध्यक्ष यांनी कांदळवन समितीच्या 36 ऑफलाईन तक्रारीपैकी संबंधित जिल्हाधिकारी व वन विभाग यांनी केलेल्या कार्यवाहीच्या आधारे (जिल्हा-मुंबई उपनगर-2, तक्रार क्र. 227,299, जिल्हा ठाणे-4 तक्रार क्र.253, 254, 268, 305) असे एकूण 6 तक्रारी निकाली काढण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच उर्वरित जिल्हा-मुंबई शहर-1, तक्रार क्र.12,<br>• जिल्हा-मुंबई उपनगर- 8 तक्रारक्र.160,204,206,217, 284, 292, 310,313,<br>• जिल्हा-ठाणे-13, तक्रार क्रमांक.180,233,239,260,280, 282, 286,296,300,301,308,309,314.<br>• जिल्हा- पालघर-3 तक्रार क्रमांक. 134,241,262<br>• जिल्हा-रायगड-5, तक्रार क्र.,191,237,290, 302,307 असे एकूण 30 प्रलंबित तक्रारींबाबत जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत नियमोचित कार्यवाही करून जिल्हा स्तरावर तक्रारी निकाली काढाव्यात व त्याबाबतचे सविस्तर इतिवृत्तामध्ये केलेल्या कार्यवाहीबाबत नोंद घेऊन समितीचे सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांच्याकडे पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. | सर्व जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणा |
| 4. | Mangorve Suraksha App वरील प्राप्त तक्रारींच्या स्थळपाहणीसाठी तारीख व स्थळपाहणी अहवाल व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहित प्रारुपात ॲपवर अपलोड करणेबाबत आढावा. | • मा. अध्यक्ष यांनी जिल्हा निहाय कांदळवन तक्रारींबाबत आढावा घेतला व सर्व जिल्हाधिकारी यांना तात्काळ त्यांचे कार्यक्षेत्रातील Mangorve Suraksha App वरील तक्रारींवर नियमोचित कार्यवाही करुन तक्रारींचा निपटारा करण्याच्या सूचना दिल्या.<br>• समितीचे अशासकीय सदस्य यांनी निदर्शनास आणून दिले की, अनेक वेळा स्थळ पाहणी निश्चित केल्यानंतर संबंधित अधिकारी उपस्थित राहत नाहीत.<br>• यावर मा. अध्यक्ष यांनी **"Mangrove Suraksha App"** संदर्भात विचारणा केली असता, विभागीय वन अधिकारी, उत्तर कोकण यांनी सदर ॲपबाबत माहिती दिली. संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत तक्रारीनुसार स्थळ पाहणी निश्चित करुन त्यानुसार पुढील कार्यवाही संबंधित विभागामार्फत केली जाते. | सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांचे संबंधित उप विभागीय अधिकारी, विभागीय वन अधिकारी, सहायक वनसंरक्षक, वनपरिक्षेत्र अधिकारी, उत्तर कोकण व दक्षिण कोकण कांदळवन विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • या संदर्भात संचालक, वनशक्ती यांनी समितीच्या शासन निर्णयानुसार कांदळवन संरक्षणाच्या दृष्टीने तक्रारींवर ४८ तासांच्या आत कार्यवाही करणे अपेक्षित आहे. त्यामुळे संबंधित वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात असो वा नसो, अशा सर्व प्रकरणांमध्ये ४८ तासांच्या आत सदर स्थळाचा व्हिडिओ, GPS स्थाननिर्देशांक तसेच तत्कालीन परिस्थितीची नोंद संबंधित प्रणालीमध्ये करणे आवश्यक राहील, जेणेकरून तक्रारीच्या वेळी प्रत्यक्ष स्थिती स्पष्टपणे दस्तऐवजीकरणात दिसून येईल, यावर समितीने सहमती दर्शविली व त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच समितीचे अध्यक्ष यांनी सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांना त्यांच्या स्तरावर कांदळवन सुरक्षा ॲप संदर्भात अधिक सुसुत्रता येण्याकरीता आवश्यक मागदर्शक सूचना निर्गमीत करण्याच्या सूचना दिल्या. | |
| 5 | पोलीस यंत्रणेमार्फत दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासाबाबत सद्यस्थिती व त्या गुन्ह्यामध्ये शिक्षा झालेल्या प्रकरणांबाबत आढावा. | • कांदळवन तक्रारींशी संबंधित प्रकरणांमध्ये पोलीस यंत्रणेमार्फत दाखल गुन्ह्यांच्या तपासाच्या अनुषंगाने, समितीचे सदस्य सचिव यांनी कळविले की पोलीस यंत्रणेकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा तक्ता तयार करून तो सर्व संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना पूर्वीच उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तथापि, अद्यापपर्यंत संबंधित पोलीस यंत्रणेकडून अपेक्षित माहिती प्राप्त झालेली नाही.<br>• त्या अनुषंगाने अध्यक्षांनी सर्व संबंधित पोलीस यंत्रणांना या बाबत विचारणा केली असता फारसा प्रतिसाद प्राप्त झाला नसल्याने पुन्हा सदर तक्ता (प्रत संलग्न) हा समितीच्या सर्व संबंधित पोलीस यंत्रणेस उपलब्ध करुन पुढील बैठकीमध्ये सर्व संबंधित पोलीस यंत्रणांनी आवश्यक ती माहिती विहित स्वरूपात समितीच्या सदस्य सचिवांकडे अनिवार्यपणे सादर करण्याच्या सूचना दिल्या. | संबंधित पोलीस यंत्रणा |
| 6 | संचालक, वनशक्ती यांचेमार्फत कांदळवन संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने दि.19.12.2018 या शासन निर्णयामध्ये कार्यवाहीकरीता निर्देश/कार्यपध्दती तयार करुन परिपत्रक निर्गमीत करणेबाबत. | • संचालक, वनशक्ती यांनी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच दिनांक 19.12.2018 च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने खाजगी कांदळवन क्षेत्रावर होणाऱ्या ऱ्हास / तोडीबाबत Forest Conservation Act, 1980 अंतर्गत वन विभागामार्फत कार्यवाही करण्याबाबत समितीच्या निदर्शनास आणून दिले.<br>• सह-अध्यक्ष, तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष यांनी नमूद केले की, केंद्र शासनाच्या दिनांक 15.05.2023 च्या कार्यालयीन आदेश / परिपत्रकानुसार पर्यावरण संरक्षण अधिनियम, 1986 decriminalized झाल्याने, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार Environment Protection Act च्या Section 15 नुसार Criminal law अमलात आणता येऊ शकत नाही. इतर कायदे जसे की, Forest Conservation Act, 1980 अंतर्गत 2023 मध्ये विभागीय वन अधिकारी यांना अंतर्गत कारवाई करण्याचे प्रदान करण्यात आलेले अधिकार व ती करण्यासंदर्भात काही मुद्द्यांवर | सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | स्पष्टता आवश्यक असून, याबाबत नोडल अधिकारी, महाराष्ट्र राज्य व सक्षम अधिकारी यांचेशी विचारविमर्श करून त्यानुसार निर्देश जारी करता येईल.<br>• याशिवाय, सध्यस्थितीत Biological Diversity Act, 2002 व Maharashtra felling of trees (Regulation) Act, 1964 व Urban Tree felling Act,1975 अंतर्गत प्रावधानांची तपासणी करुन खाजगी क्षेत्रातील / वनेत्तर क्षेत्रातील कांदळवन ऱ्हासाच्या प्रकरणांवर कार्यवाही करता येईल किंवा कसे, तशी कार्यवाही करण्यासाठी सक्षम प्राधिकारी कोण याबाबत तपासणी करुन व शासनाच्या मान्यतेनंतर पुढील आवश्यक कार्यवाही करणे उचित राहील, असे मत सह-अध्यक्ष यांनी व्यक्त केले. | |
| 7 | आयत्या वेळेचे विषय | | |
| 1 | कांदळवन समितीच्या बैठकीतील सदस्यांच्या उपस्थितीबाबत | • कांदळवन संरक्षण व संवर्धन समितीचे सदस्य वारंवार अनुपस्थित राहिल्याची बाब मा. अध्यक्ष यांच्या निदर्शनास आली आहे.<br>• या अनुषंगाने अध्यक्षांनी, समितीमध्ये समाविष्ट सर्व सदस्यांना कांदळवन विषयक बाबीची माहिती असलेल्या प्रतिनिधींना पुढील बैठकीस प्राधान्याने उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या. | सर्व समिती सदस्य<br>सर्व संबंधित महानगरपालिका |

(डॉ. रविकिरण गोवेकर, भा.व.से.)
सह अध्यक्ष
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती, तथा
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई

(रुबल अग्रवाल, भा. प्र. से.)
अध्यक्ष,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग